# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**मराठी विभाग**

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०१५

# संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन

## राजगुरुनगरच्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात उत्साह : विद्यार्थ्यांचा सहभाग

राजगुरुनगर, दि. २६ (प्रतिनिधी) - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत कठोर परिश्रम घेऊन तयार केलेल्या भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या उद्देशाने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमात भारतीय संविधानाची विद्यार्थ्यांना ओळख करून देताना संविधानातील प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. एस. बी. सूर्यवंशी, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. डी. एम मारकड, डॉ. संजय शिंदे, डॉ. महेश घाडगे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रा. एच. पी. जाधव, प्रा. अशोक थिगळे, प्रा. एस. व्ही. खेत्रे, प्रा आर टी डगले आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य पाटील यांनी भारतीय संविधानाची विद्यार्थ्यांना ओळख करून देताना राज्यघटना तयार करण्यामध्ये डॉ. आंबेडकर यांचे योगदान अधोरेखित केले. जगातील प्रमुख देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भारतीय संविधान तयार करून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला अर्पण केले. त्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरु झाल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे आपल्या देशात लोकशाही निर्माण झाली. या लोकशाहीने अल्पावधीत आपल्या सर्वांच्या जीवनात सुरक्षितता, स्थैर्य, आत्मसन्मान, प्रतिष्ठा निर्माण केली आहे. लोकशाहीचा जास्तीत जास्त विकास व्हावा यासाठी या संविधान दिनाचे आपल्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. संविधानातील नागरिकांचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या, आपली संसदीय शासन पद्धती व त्याची माहिती व त्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करायला हवा. असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्तविक, सूत्रसंचालन आणि संविधानातील प्रास्ताविकाचे वाचन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय शिंदे यांनी केले.



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात संविधान दिनी महाविद्यालयात संविधानातील प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन केले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख